# हेटवणे प्रकल्पाचा जलबोगदा निर्मितीत राष्ट्रीय विक्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** सिडको महामंडळाने हेटवणे जलावर्धन योजनेतील जलबोगदा निर्मितीत राष्ट्रीय विक्रम नोंदवत प्रगतीचा नवा टप्पा गाठला आहे. या कामगिरीमुळे नवी मुंबईकरांच्या वाढत्या पाणी पुरवठ्याच्या गरजा भागविण्यास मोठा हातभार लागणार आहे.

**टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) 'फ्लेमिंगो' च्या साहाय्याने केवळ एका महिन्यात तब्बल ७७७ मीटर लांबीचा बोगदा खोदण्याची ऐतिहासिक कामगिरी केली.**



हेटवणे जलावर्धन प्रकल्पातील जलबोगदा.

सिडकोच्या जल बोगदा पॅकेज-१ अंतर्गत जुलै २०२५ मध्ये अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने ३.२ मीटर व्यासाच्या बोगद्यात टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) 'फ्लेमिंगो' च्या साहाय्याने केवळ एका महिन्यात तब्बल ७७७ मीटर लांबीचा बोगदा खोदण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. यामुळे देशात बोगदा खोदकामाचा नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. पॅकेज-१ मधील एकूण ८.७ किमी लांबीच्या बोगद्यांपैकी, अफकॉन्सने आतापर्यंत ३.४ किमी लांबीचे बोगदे खोदण्याचे काम पूर्ण केले आहे.

तसेच याच कंपनीने गेल्या वर्षी जुलै महिन्यात मुंबईतील अमर महाल -२ या जलबोगदा प्रकल्पात प्रस्थापित केलेला ६५३ मीटरचा मागील राष्ट्रीय मासिक विक्रम मोडला होता. तसेच मे महिन्यात या कंपनीने एका महिन्यात ७१४ मीटर खोदकाम पूर्ण करून प्रशासनाच्या कामात गती आणली होती.

'या विक्रमाने राष्ट्रीय बोगदा खोदकामात एक नवा मानक निर्माण केला. आम्ही हीच गती टिकवून ठेवण्यास कटिबद्ध आहोत आणि पुढील काही महिन्यांत आणखी मोठी कामगिरी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे,' असे अफकॉन्सचे संचालक आर. अनंतकुमार यांनी सांगितले. या बोगद्याच्या कामासाठी अनेक तांत्रिक आणि लॉजिस्टिक अडचणींवर मात करावी लागली. बोगद्याचे संरेखन सह्याद्री प्रदेशातील कठीण भूगर्भीय रचनांमधून जात असल्याने खोदकाम अधिक अवघड होते. जागेच्या मर्यादांमुळे उपकरणांच्या स्थापनेवर व हालचालींवर अडथळे आले. त्याशिवाय, ४ किमीच्या कठीण मार्गावरून साहित्य वाहतूक करावी लागली. या परिस्थितीत बोगदा अनुकूल धोरणांचा अवलंब करून आम्ही काम पुढे नेले, असेही अनंतकुमार यांनी स्पष्ट केले.